महाराष्ट्र शासन

(ग्राम विकास विभाग)

**जिल्हा परिषद, सोलापूर अंतर्गत गट-क मधील सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठीची जाहिरात**

**पदभरती सन २०१९ करिता अर्ज भरणेकरिता मुदतवाढ**

**जाहिरात क्रमांक-०१/२०१९ दिनांक ०३/०३/२०१९ संदर्भाने.**

या कार्यालयाद्वारे जिल्हा परिषद, सोलापूर अंतर्गत गट –क या संवर्गातील रिक्त पदे ऑनलाईन पध्दतीने भरण्याकरीता जाहिरात दैनिक लोकमत, दैनिक दिव्यमराठी व दैनिक संचार या मराठी वृत्तपत्रामध्ये तसेच जिल्हा परिषदेच्या www.zpsolapur.gov.in व शासनाच्या www.mahapariksha.gov.in या संकेतस्थाळावर दि.०३ मार्च २०१९ ला प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यामध्ये पदभरतीसाठी ऑनलाईन अर्ज मागविणे बाबत मुदत दिनांक १६/०४/२०१९ पर्यंत देणेत आली होती. तथापि, शासन पत्र क्र. संकीर्ण-२०१९/ प्र.क्र.२४१/भाग-१/आस्था-८/ दिनांक १६ एप्रिल २०१९ अन्वये सदर पदभरतीसाठी ऑनलाईन अर्ज मागविणेबाबत खालील प्रमाणे मुदतवाढ देण्यांत येत आहे.

जिल्हा परिषदेतील पदांच्या ऑनलाईन भरतीसाठी अर्ज भरणेकरीता **दिनांक २३/०४/२०१९** (११.५९ p.m.) पर्यंत मुदतवाढ देण्यांत येत आहे. तसेच सदरची मुदतवाढ ही अंतिम असुन, यापुढे कोणत्याही कारणास्तव मुदतवाढ दिली जाणार नाही. तसेच सदर बदला व्यतिरिक्त दिलेल्या जाहिरातीमध्ये इतर कोणताही बदल नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(डॉ.राजेंद्र भारुड ) भाप्रसे

मुख्य कार्यकारी अधिकारी

जिल्हा परिषद,सोलापूर